International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.10 No.1 September – October 2022

# ग्रामीण व शहरी महाविद्यालयातील ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या आधुनिक सोयी सुविधांचा तुलनात्मक अभ्यास

**प्रा. शशिकांत सुभाष पाटील[1] आणि डॉ. वैशाली यु. भक्त[2]**
[1]संशोधक, जे. जे. टी. विद्यापीठ, राजस्थान
[2]मार्गदर्शक, जे.जे.टी.विद्यापीठ,राजस्थान
*Corresponding Author - प्रा. शशिकांत सुभाष पाटील*
**DOI - 10.5281/zenodo.7223502**

***सारांश:***

*प्रस्तुत संशोधनात ग्रामीण व शहरी महाविद्यालयातील ग्रंथालयातील उपलब्ध असलेल्या आधुनिक सोयी सुविधांचा अभ्यास सर्वेक्षण पद्धतीने केला आहे. लॉटरी व सहेतुक नमुना निवड पद्धती- 01अभियांत्रिकी, 03 शिक्षणशास्त्र महाविद्यालय तसेच 05 कला, वाणिज्य ,विज्ञान महाविद्यालय सहेतुक नमुना निवड पद्धतीने यांची निवड करण्यात आली.ग्रामीण व शहरी महाविद्यालयातील ग्रंथालयातील उपलब्ध असलेल्या आधुनिक सोयी सुविधांचा मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत येतो.NAAC प्रमाणित व NAAC अप्रमाणित महाविद्यालयातील ग्रंथालयातील उपलब्ध असलेल्या आधुनिक सोयी सुविधांचा मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येतो.अभियांत्रिकी व शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील ग्रंथालयातील उपलब्ध असलेल्या आधुनिक सोयी सुविधांचा मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येतो.*

**प्रस्तावना:**

शाळा महाविद्यालय स्तरावर आजची ग्रंथालये कात टाकत असून. त्यांचे रूपांतर 'ग्लोबल नॉलेज सेंटर्स'मध्ये होऊ घातले आहे. सर्व ग्रंथालयातील संगणकीकरण ही त्याची पहिली पायरी आहे आणि लहानमोठ्या सर्व ग्रंथालयाचे बदललेले स्वरूप हे आपल्यास लक्षात येते.विज्ञान तंत्रज्ञानाच्या नेटवर्किंगमुळे अजून त्यात मोलाची भर पडली आहे. विज्ञान तंत्रज्ञानाच्या वापरामुळे ज्ञानाच्या क्षेत्रांतील कार्य ग्रंथालयात मधून सुरू असते अशावेळी अद्यावत ज्ञान ठेवण्यासाठी ग्रंथालयात नवीन ज्ञान प्राप्त करण्यासाठी तंत्रविज्ञानाचा होणारा वापर महत्त्वपूर्ण आहे.

विज्ञान तंत्रज्ञानाचा वापर हा केवळ ग्रंथालया पुरता मर्यादित राहिलेला विषय नसून उद्योग-व्यापार दळणवळण, माहितीची देवाण-घेवाण, तसेच देशाचे संरक्षण करणाऱ्या यंत्रणेमध्ये विज्ञान तंत्र विज्ञानाने नवीन बदल घडून आलेला आहे परंतु हा बदल स्वीकारण्याची क्षमता ही मानवी घटकामध्ये असणे आवश्यक आहे उद्योगक्षेत्रातील आलेली भरभराट त्याचे उत्तम उदाहरण आहे.हि स्थिती मात्र ग्रंथालयांमध्ये आज देखील पाहिजे त्या प्रमाणात दिसून येत नाही. येथील मनुष्यबळ आज देखील विज्ञान तंत्र विज्ञानातील किंवा ग्रंथालयातील सोयीसुविधा वाढविण्यासाठी आवश्यक असलेली संसाधने वापरत असतांना साशंक असतात. विज्ञान तंत्रज्ञान वापरण्यास संदर्भातील जाणीव नसणे हे

त्यामागील एक प्रमुख कारण ठरते. ग्रंथालयातील उपलब्ध असलेल्या सोयी-सुविधा वाढविण्यासाठी केवळ संगणक वापरणे एवढीच अर्थ यात अपेक्षित नसून मोबाइल, कॅमेरा, स्मार्टकार्ड, स्कॅनर, इ बुक रीडर, अशा अनेक आधुनिक साधनांचा वापर ग्रंथालयात होणे आवश्यक ठरतो. परंतु ते होताना दिसून येत नाहीत्यामागे अनेक कारणं कारणीभूत असली तरी ग्रामीण व शहरी या विभागांमध्ये त्यात तफावत दिसून येतो महाविद्यालयाचा दर्जा तसेच NAAC प्रमाणित व NAAC अप्रमाणित असलेल्या महाविद्यालयात देखील त्यामध्ये फरक दिसतो एवढेच काय तर कला विज्ञान व वाणिज्य तसेच अभियांत्रिकी, शिक्षणशास्त्र या विद्याशाखेतील ग्रंथालयांमध्ये आधुनिक साधने वापरण्यास संदर्भात भिन्नता जाणवते.

हीच स्थिती अभ्यासण्यासाठी संशोधकाने ग्रामीण व शहरी महाविद्यालयातील ग्रंथालयातील उपलब्ध असलेल्या सोयी सुविधांचा तुलनात्मक अभ्यास हे सदर संशोधन कार्य हाती घेतलेले होते.

**उद्दीष्ट:**

1. ग्रामीण व शहरी महाविद्यालयातील ग्रंथालयातील उपलब्ध असलेल्या आधुनिक सोयी सुविधांचा तुलनात्मक अभ्यास करणे.
2. NAAC प्रमाणित व NAAC अप्रमाणित महाविद्यालयातील ग्रंथालयातील उपलब्ध असलेल्या आधुनिक सोयी सुविधांचा तुलनात्मक अभ्यास करणे.
3. अभियांत्रिकी व शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील ग्रंथालयातील उपलब्ध असलेल्या आधुनिक सोयी सुविधांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**परिकल्पना:**

1. ग्रामीण व शहरी महाविद्यालयातील ग्रंथालयातील उपलब्ध असलेल्या आधुनिक सोयी सुविधांचा मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.
2. NAAC प्रमाणित व NAAC अप्रमाणित महाविद्यालयातील ग्रंथालयातील उपलब्ध असलेल्या आधुनिक सोयी सुविधांचा मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.
3. अभियांत्रिकी व शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील ग्रंथालयातील उपलब्ध असलेल्या आधुनिक सोयी सुविधांचा मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.

**संशोधनाची कार्यपद्धती:**

| **संशोधन पद्धती** - सर्वेक्षण पद्धती | |
|---|---|
| **जनसंख्या** | संशोधनासाठी संशोधकाने नंदुरबार जिल्ह्यातील सर्व अभियांत्रिकी, शिक्षणशास्त्र महाविद्यालय तसेच कला, वाणिज्य ,विज्ञान महाविद्यालय यांचा जनसंख्या म्हणून निश्चिती केली होती |

| | |
|---|---|
| **न्यादर्श** | लॉटरी व सहेतुक नमुना निवड पद्धती- 01अभियांत्रिकी, 03 शिक्षणशास्त्र महाविद्यालय तसेच 05 कला, वाणिज्य ,विज्ञान महाविद्यालय सहेतुक नमुना निवड पद्धतीने यांची निवड करण्यात आली. |
| **संशोधन साधने** | स्वनिर्मित ग्रंथालयातील आधुनिक सोयीसुविधा मापन चाचणी वापरण्यात आली यात ग्रंथालयातील उपलब्ध असलेले विविध आधुनिक संसाधनांचा समावेश प्रत्यक्ष ग्रंथालयात आहे किंवा नाही तसेच त्यांचा वापर प्रत्यक्ष विद्यार्थी, शिक्षक तसेच इतर घटक करतात किंवा नाही यावर आधारित विविध प्रश्न त्या प्रश्नावलीत घेण्यात आले तसेच ग्रंथपालन कडून प्रत्यक्ष ती माहिती प्रश्नावली मार्फत नोंदविण्यात आली. |
| **संख्याशास्त्रीय परिमाणे-** मध्यमान, प्रमाणविचलन व 't' मूल्य | |

**संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन :**

प्राप्त माहितीच्या दिलेल्या प्रतिसादाचे विश्लेषण करून पुढील प्रमाणे परिकल्पना परीक्षण करण्यात आले होते.

1. ग्रामीण व शहरी महाविद्यालयातील ग्रंथालयातील उपलब्ध असलेल्या आधुनिक सोयी सुविधांचा मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.
2. NAAC प्रमाणित व NAAC अप्रमाणित महाविद्यालयातील ग्रंथालयातील उपलब्ध असलेल्या आधुनिक सोयी सुविधांचा मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.
3. अभियांत्रिकी व शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील ग्रंथालयातील उपलब्ध असलेल्या आधुनिक सोयी सुविधांचा मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.

| महाविद्यालय | | N | M | SD | Table 't' value | Obtained 't' value | Decision |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मोबाइल, कॅमेरा, स्मार्टकार्ड, स्कॅनर, इ बुक रीडर | ग्रामीण | 5 | 8.96 | 1.25 | 2.00 | 4.54 | त्याग |
| | शहरी | 4 | 10.26 | 1.11 | | | |
| मोबाइल, कॅमेरा, स्मार्टकार्ड, स्कॅनर, इ बुक रीडर | NAAC प्रमाणित | 5 | 9.53 | 1.07 | | 5.79 | त्याग |
| | NAAC अप्रमाणित | 4 | 7.5 | 1.13 | | | |
| मोबाइल, कॅमेरा, स्मार्टकार्ड, स्कॅनर, इ बुक रीडर | शिक्षणशास्त्र | 3 | 8.93 | 1.23 | | 4.19 | त्याग |
| | अभियांत्रिकी | 01 | 10.23 | 1.32 | | | |

**निष्कर्ष :**

1. ग्रामीण व शहरी महाविद्यालयातील ग्रंथालयातील उपलब्ध असलेल्या आधुनिक सोयी सुविधांचा मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत येतो.
2. NAAC प्रमाणित व NAAC अप्रमाणित महाविद्यालयातील ग्रंथालयातील उपलब्ध असलेल्या आधुनिक सोयी सुविधांचा मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येतो.
3. अभियांत्रिकी व शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील ग्रंथालयातील उपलब्ध असलेल्या आधुनिक सोयी सुविधांचा मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येतो.

**सर्वसामान्य चर्चा व निष्कर्ष:**

1. ग्रामीण महाविद्यालयातील आधुनिक सोयीसुविधा यांच्या तुलनेत शहरी भागातील महाविद्यालयांमध्ये आधुनिक सोयीसुविधा जास्त असून यामागे त्या भागातील विद्यार्थ्यांची आधुनिक सोयीसुविधा वापरण्यात संदर्भातील तत्परता तसेच उपलब्ध मनुष्यबळ व आर्थिक संसाधन हे कारणे कारणीभूत असू शकतात.
2. NAAC अप्रमाणित महाविद्यालयातील आधुनिक सोयी सुविधा कमी प्रमाणात तर NAAC प्रमाणित महाविद्यालयांमध्ये आधुनिक सोयीसुविधा जास्त प्रमाणात दिसून येतात NAAC प्रमाणिकरण करण्याच्या प्रक्रियेत महाविद्यालयाला विविध सोयी सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे असते त्यातून महाविद्यालयाची तपासणी होऊन महाविद्यालयाला गुणदान केले जाते त्याचा परिणाम ग्रंथालया वर देखील दिसून येतो.
3. शिक्षणशास्त्र महाविद्यालय हे जरी व्यवसायिक महाविद्यालय असले तरी या महाविद्यालयांमध्ये आधुनिक सोयीसुविधा अभियांत्रिक महाविद्यालयातील सोयीसुविधांनी पेक्षा कमी आहेत तर अभियांत्रिक महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांना आधुनिक विज्ञानाचे बरोबरच विद्यार्थी तंत्रविज्ञान आतून साक्षर असतात त्यामुळे या ठिकाणी असलेल्या ग्रंथालयात विविध सोयी सुविधांचा वापर अधिक प्रमाणात ते करतात.

**संदर्भग्रंथ सूची :**


1. Best & Kahn. (2006). Research in Education (9th Ed). Delhi: Prentice Hall of India.
2. Garrett, H .E. (2006). Statistics in Psychology & Education (1st Ed. Indian Reprint). Delhi: Sage Publication.
3. Kumar, Ranjit. (2011). Research Methodology a step by step guide for beginners (3rd Ed). New Delhi: Sage Publication.
4. Raja Kumar, P.G. (2013). Research Methodology (1st Ed). Delhi: APH Publishing Corporation.
5. Peltu, M.(1982). Information technology: An overview. In H. Taylor (Ed.). Information management and organizational change (pp. 81-86). New Delhi: Aslib

6. Murthy. S.S. (1999). Role of libraries in the new millennium of information technology. DESIDOC Bulletin of Information Technology, 19(4-5), 3-10
7. Jadhav. V., Gaikwad. M. N. (2014). Challenges before Academic Library Professionals Working in Maharashtra. Changing Trends in Academic Libraries and Librarianship in Digital Environment. 377-381.
8. Rayudu, C.S. (1997). Communication. Mumbai: Himalaya
9. Gaikwad, M. N. Use Of Social Networking Sites Among Undergraduate Students Of Arts And Commerce College, Madha, Dist. Solapur, Maharastra.
10. Haravu, L.J. (1993). Library automation and networking in India: An overview of recent development. 40(1), 32-40